ISSN 2231-1629
Knowledge Resonance

# नागपूर शहरातील उच्च शिक्षित (पदव्युत्तर व त्यावरील) धनगरांच्या राजकीय जागृतीचे चिकित्सक अध्ययन

**प्रा. दमयंती का. खडसे**
राज्यशास्त्र विभाग,
एल. ए. डी. कनिष्ठ महाविद्यालय,शंकरनगर, नागपूर.

**प्रास्ताविक :**

प्रस्तुत अध्ययनात नागपूर शहरातील उच्च शिक्षित (पदव्युत्तर व त्यावरील) धनगरांच्या राजकीय जागृतीचे चिकित्सक अध्ययन करण्यात येत आहे. त्यामुळे राजकीय जागृती ही संकल्पना स्पष्ट करणे अनिवार्य ठरते. समाजातील उच्च शिक्षितांचा वर्ग हा समाजाचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. या वर्गाला समाजातील बुद्धिजीवी वर्ग म्हटल्यास वावगे ठरणार नाही. भारतीय समाजाच्या सामाजिक व शैक्षणिक वातावरणात महत्त्वपूर्ण स्थान असलेल्या या वर्गाची राजकीय जागृती महत्त्वपूर्ण बाब ठरते. म्हणून नागपूर शहरातील उच्च शिक्षित धनगरांच्या राजकीय जागृतीचे अध्ययन प्रस्तुत संशोधनकार्याद्वारे केले गेले आहे. उच्च शिक्षित धनगरांचा वर्ग हा राजकीय जागृतीद्वारे उत्कृष्ट राजकीय सहभाग दर्शवू शकतो व त्याद्वारे निर्णयप्रक्रियेत सहभागी होऊन राजकीय व्यवस्था, शासन यावर नियंत्रण ठेवू शकतो. त्यामुळे प्रथम राजकीय जागृतीच्या संकल्पनेचे स्पष्टीकरण करणे अनिवार्य ठरते.

**राजकीय जागृतीचा अर्थ :**

राजकीय सहभागाचा राजकीय जागृतीशी सकारात्मक संबंध असतो. राजकीय जागृती ही राजकीय सहभागाची पूर्वअट मानली जाते. लोकतांत्रिक राजकीय व्यवस्थेतील व्यक्ती ही आपल्या सभोवताली घडणाऱ्या घटनांची माहिती जग, देश, समाज व आपल्या शासनासंबंधी आणि राजकीय पक्षासंबंधी माहिती राजकीय जागृतीविषयक माध्यमाने प्राप्त करीत असते आणि स्वतःच्या राजकीय जाणिवा वाढविण्याचा प्रयत्न करीत असते.

एन. जी. एस. किनी यांनी मतदात्यांच्या राजकीय जागृतीच्या मापनामध्ये पुढील तीन प्रश्न महत्त्वपूर्ण मानले आहेत- अ) त्याने काय जाणून घेतले आहे?, ब) त्याने किती प्रमाणात जाणून घेतले आहे? आणि क) त्याने कोणत्या दृष्टिकोनातून ते जाणून घेतले आहे?, हे प्रश्न राजकीय जागृतीच्या वास्तविक, संख्यात्मक व गुणात्मक आयामांशी संबधित आहेत. मतदारांमध्ये पक्षाविषयी, मुद्यांविषयी व राजकीय नेत्यांविषयी असलेली जागरूकता महत्त्वपूर्ण आहे.

योगेंद्र अमर यांच्या मते, ''जनतेच्या मनात राजकीय जागृती निर्माण करण्यात व त्यांची मतदानप्रवृत्ती प्रभावित करण्यात राजकीय जागृतीविषयक माध्यमांची एक महत्त्वपूर्ण भूमिका असते.''

**धनगर समाजाची सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमी :**

प्रस्तुत अध्ययनात नागपूर शहरातील उच्च शिक्षित पदव्युत्तर धनगरांच्या राजकीय जागृतीचे अध्ययन करण्यात येत असल्यामुळे, राजकीय जागृती ही संकल्पना अभ्यासल्यानंतर धनगर समाजाचा सामाजिक व सांस्कृतिक आढावा घेणे महत्त्वपूर्ण ठरते. म्हणून धनगर समाजाच्या सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमीचा आढावा पुढीलप्रमाणे-

भारतातील अनेक भटक्या-निमभटक्या जमातीपैकी धनगर ही एक निमभटकी जमात आहे. ती अतिप्राचीन जमात असून अनेक संशोधनाअंती ही एक आदिवासी वन्य जात आहे, असे सिद्ध झाले आहे. धनगरांना 'धनाचे-आगर-धनगर' म्हटले जात असले, तरी त्यांची आर्थिक परिस्थिती मात्र दयनीय आहे. संपूर्ण भारतात या जातीचे वास्तव्य आहे. अध्ययनापूर्वी प्रथम धनगर या शब्दाचा अर्थ जाणून घेणे महत्त्वाचे ठरते.

धनगर या शब्दात धन आणि गर असे दोन शब्द मिळालेले आहेत. धन या शब्दाचा अर्थ येथे लक्ष्मी, पैसा असा होत नाही तर तो पशूंसाठी संबोधला गेलेला आहे. तत्कालीन समाजात पशुधन मोठ्या प्रमाणात होते. जंगलेही मोठ्या प्रमाणात उपलब्ध

होती. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीजवळ पशू असायचे. तत्कालीन समाजात श्रमाचा मोबदला, अथवा कुठलीही देवाण-घेवाण ही धान्य, पशू, वस्तू यांच्या स्वरूपात व्हायची. तेव्हा पैसा, नाण्यांचे अस्तित्व नव्हते. त्यामुळे धनगर शब्दाचा अर्थ येथे पशुधन असा घेतला जाईल. धन म्हणजे पशुधन व गर म्हणजे पालनपोषण करणारा म्हणजे पशूंचे पालनपोषण करणारी व्यक्ती म्हणजे धनगर! तत्कालीन समाजात ज्याच्याजवळ मोठ्या संख्येने पशू असायचे तीच व्यक्ती राजा, गटप्रमुख, कबिलाप्रमुख असायची. त्यामुळे पशुधन असणारे धनगर हीच या शब्दाची खरी उत्पत्ती होय.

हा समाज अतिप्राचीन समाज आहे. श. बा. जोशी यांनी 'मऱ्हाटी संस्कृती' या ग्रंथात ऋग्वेद व अथर्ववेदात धनगर समाजाचा उल्लेख आढळतो, असे लिहिले आहे. वैदिक मंत्रामध्येही धनगर समाजाचा उल्लेख आढळतो. अर्थात हे आर्य होते. वैदिक काळात त्यांना अविपा, अजपा, मेषपाल, गोपाल अशा नावांनी ओळखले जाई. आजही धनगर भारतातील विविध प्रांतात वेगवेगळ्या नावाने ओळखला जातो. जसे- धगनर, गडरिया, धनकर, धनवर, धनपाल, मेषपाल, ढनगर, ढंगर, ढेंगर, निखर, कुरवार, ओरॉव, इडियन, गुड्डी, गोल्ला, गोल्लु इत्यादी नावांनी ओळखला जातो. त्याचप्रमाणे या समाजामध्ये अनेक पोटजातीही आहेत. त्यात अहिर, डांगे, गटारी, हांडे, हाटकर, तेलवार, शैगर, खुटेकर, तेलंगी, तेल्लारी, कोकाणी, कानडे, वऱ्हाडे, झाडे, डोंगरी इत्यादी पोटजातींचा समावेश या धनगर समाजामध्ये होतो.

प्रामुख्याने धनगरांचा पारंपरिक व्यवसाय म्हणजे पशुपालन होय. विशेषतः शेळ्या-मेंढ्या पाळणाऱ्यांना धनगर म्हटले जाते. धनगर हा आपल्या शेळ्या-मेंढ्यांच्या पालनपोषणासाठी सुपीक प्रदेशाच्या, कुरणाच्या शोधात भटकत असतो.

धनगर समाज हा अशिक्षित, अस्थायी, अप्रगत असूनही त्याने आपली संस्कृती मात्र उत्तम रीत्या जतन केली आहे. धनगरांचे अनेक लोकसाहित्य अजूनही लोकप्रिय आहे. त्यात लोककथा, लोकगीते, लोकनृत्य यांचा समावेश होतो. सुंबरान मांडणे, ओव्या गाणे, गजीनृत्य खेळणे, इत्यादी प्रकार धनगरांच्या लोकसाहित्याचा अविभाज्य भाग आहे.

धनगर समाज खडतर जीवन जगणारा समाज आहे. त्याला प्रत्येक क्षणी निसर्गाशी लढावे लागते. शेळ्या-मेंढ्यांचा कळप अनोळखी ठिकाणी घेऊन जाताना किंवा उघड्या रानात वस्ती करताना चोर, दरोडेखोर, जंगली जनावरांची भीती असते. यामुळे देवाने आपले रक्षण करावे म्हणून हा समाज देवाला खूप मानतो. किंबहुना तो देवभोळाच आहे, असे म्हटले तरी चालेल. तो भटकंतीतही आपले देव-देव्हारा सोबत घेऊन फिरतो. धनगरांच्या दैवतांमध्ये महादेव, विठ्ठल, खंडोबा, बिरोबा, धुळाबो, शिंग्रोबा, जोतिबा, तसेच तुळजाभवानी, यमाई, सटवाई, जोखाई, सती आसरा, मावलाया हे देव व देवता आढळतात.

या समाजाचा राजकीय इतिहास बघता अगदी खूप प्रगल्भ स्वरूपाचा होता, तो उजागर मात्र झाला नाही, किंवा केला गेला नाही. धनगरांमधील काही सुशिक्षित लोकांनी तो उजागर करण्याचा प्रयत्न केला व लोकांसमोर आणला.

पूर्वी धनगर हे सधन, संपन्न होते. मोठ्या प्रमाणात जंगले, कुरणे उपलब्ध असल्यामुळे आजच्या पशुपालकांसारख्या समस्या त्या काळातील पशुपालकांना नव्हत्या. त्यामुळे त्या काळातील पशुपालक श्रीमंत, धनवान होते. त्या काळातील पशुपालकांनी राजसत्ताही उपभोगल्या होत्या. आपली साम्राज्ये निर्माण केली होती. भारतातील सर्वात जुनी समजल्या जाणाऱ्या आर्य संस्कृतीचे जनक आर्य हे पशुपालक होते, तर भारतात नव्याने शोधण्यात आलेल्या आर्यपूर्व द्रविड संस्कृतीतील द्रविड हेसुद्धा पशुपालक होते. या काळात अनेक युद्धे पशुधनासाठी व चराई क्षेत्रासाठी झालेली होती, असा उल्लेख वैदिक वाङ्मयात आहे. हा समाज लढवय्या, क्षत्रिय, लष्करी वृत्तीचा समाज म्हणून ओळखला जातो. म्हणून यात अनेक क्षत्रिय आडनावे आढळतात तसेच अनेक राजघराण्यांचेही उल्लेख आढळतात. त्यात प्रामुख्याने मौर्य, सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकूट, चालुक्य, अभिर, पाल, पल्लव, पांड्य, प्रमार, चालुक्य, सोलंकी, परिहार, तक्षक, हुण, हुल, होळकर इत्यादी. अशी मोठमोठी घराणी ही पशुपालक धनगरांची होती. परंतु, वर्तमानकाळातील धनगरांना या चमत्कारिक इतिहासाचा अभिमान बाळगून वर्तमानकाळात प्रगती साधता येणार नाही. धनगरांचा वर्तमानकाळ हा दारिद्र्य, उपेक्षा व मागासलेपणा यांनीच भरलेला आहे. हे चित्र बदलण्यासाठी आजच्या धनगरांनी राजकीय, सामाजिकदृष्ट्या जागृत होणे गरजेचे आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत अध्ययनात 'नागपूर शहरातील उच्च शिक्षित (पदव्युत्तर व त्यावरील) धनगरांच्या राजकीय जागृतीचे अध्ययन' करण्यात येत आहे. त्यासाठी नागपूर शहरातील धनगर समाजातील उच्च

शिक्षित म्हणजेच पदव्युत्तर आणि त्यावरील शिक्षण घेतलेला वर्ग हा या अध्ययनाचा समग्र आहे. या समग्रातून एकूण 20 उत्तरदात्यांची निवड 'यादृच्छिक नमुना निवड' या पद्धतीने करण्यात आली. त्यासाठी नागपूर शहराचे चार भागात वर्गीकरण करण्यात आले. पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण या चार भागातील प्रत्येक भागातून 5 असे एकूण 20 उत्तरदाते निवडण्यात आले. तथ्यसंकलन करण्यापूर्वी राजकीय जागृती व धनगर समाज यांचा थोडक्यात आढावा घेण्यात आला. तथ्यसंकलनासाठी सर्वेक्षण पद्धतीतील मुलाखत अनुसूची या तंत्राचा अवलंब करण्यात आला. ही माहिती प्रत्यक्ष मुलाखत घेऊन, निरीक्षण करून गोळा करण्यात आली. या माहितीचे विश्लेषण सांख्यिकीय पद्धतीने म्हणजेच गणना, वारंवारिता, टक्केवारी काढून करण्यात आले. तसेच माहितीच्या निर्वचनासाठी सारणी, आलेख, रेखाचित्र यांचा वापर केला गेला.

प्रस्तुत अध्ययनासाठी खालील गृहीतकृत्याला आधार मानून संशोधन करण्यात आले. 'नागपूर शहरातील उच्च शिक्षित धनगरांच्या राजकीय जागृतीचे प्रमाण उच्च आहे'.

**नागपूर शहातील उच्च शिक्षित धनगरांमधील राजकीय जागृती :-**

नागपूर शहरातील उच्च शिक्षित धनगरांमधील राजकीय जागृतीचे प्रमाण जाणून घेण्यासाठी 5 बाबींचे एक अनुमाप तयार करण्यात आले. त्या अनुमापाच्या आधारावर 5 प्रश्न तयार करण्यात आले. या प्रश्नांना उत्तरदात्यांचा खालीलप्रमाणे प्रतिसाद लाभला-

प्रस्तुत अध्ययनातील एकूण 20 उत्तरदात्यांपैकी नियमित वृत्तपत्र वाचणाऱ्यांची संख्या 15 असून त्याचे शेकडा प्रमाण 75ः आहे. अधूनमधून वृत्तपत्र वाचणाऱ्यांची संख्या 01 असून त्याचे शेकडा प्रमाण 0.5ः आहे. एखाद्या वेळेस वृत्तपत्र वाचणाऱ्यांची संख्या 03 असून त्याचे शेकडा प्रमाण 15ः आहे, तर अजिबात वृत्तपत्र न वाचणाऱ्यांची संख्या 01 असून त्याचे शेकडा प्रमाण 0.5ः आहे.

एकूण उत्तरदात्यांपैकी दूरदर्शनवरील बातम्या नियमित पाहणाऱ्यांची संख्या 15 असून त्याचे शेकडा प्रमाण 75ः आहे. अधूनमधून बातम्या बघणाऱ्यांची संख्या 02 असून त्याचे शेकडा प्रमाण 10ः आहे. एखाद्या वेळेस बातम्या बघणाऱ्यांची संख्या 03 असून त्याचे शेकडा प्रमाण 15ः आहे. अजिबात बातम्या न बघणाऱ्यांची संख्या शून्य आहे. म्हणजेच उच्च शिक्षित सगळेच लोक बातम्या बघतात.

राजकीय विषयावर कुटुंबसदस्य किंवा मित्रमंडळीशी चर्चा करणाऱ्यांमध्ये एकूण 20 नमुन्यांपैकी नियमित चर्चा करणाऱ्यांची संख्या 04 असून त्याचे शेकडा प्रमाण 20ः आहे. अधूनमधून चर्चा करणाऱ्यांची संख्या 09 असून त्याचे शेकडा प्रमाण 45ः आहे. एखाद्या वेळेस चर्चा करणाऱ्यांची संख्या 06 असून त्याचे शेकडा प्रमाण 30ः आहे, तर राजकीय विषयावर अजिबात चर्चा न करणाऱ्यांची संख्या 01 असून त्याचे शेकडा प्रमाण 0.5ः आहे.

एकूण 20 नमुन्यांपैकी सर्व मूलभूत अधिकारांची माहिती असणाऱ्यांची संख्या 13 असून त्याचे शेकडा प्रमाण 65ः आहे. तीन अधिकारांची माहिती असणाऱ्यांची संख्या 01 असून त्याचे शेकडा प्रमाण 05ः आहे. एक-दोन अधिकार माहीत असणाऱ्यांची संख्या 05 असून त्याचे शेकडा प्रमाण 25ः आहे व एकही अधिकार माहिती अजिबात नसणाऱ्यांची संख्या 01 असून त्याचे शेकडा प्रमाण 05ः आहे.

वरील सारणीवरुन हे स्पष्ट होते की, धनगर समाजातील उच्चशिक्षित वर्गामध्ये एकूण प्रमाणामध्ये नियमित वृत्तपत्र वाचणाऱ्यांचे प्रमाण उत्तम आहे तसेच दूरदर्शनवरील बातम्या नियमित बघणाऱ्यांचे प्रमाणही उत्तम आहे. तर दूरदर्शनवरील राजकीय विश्लेषणाचे कार्यक्रम नियमित बघणाऱ्यांचे प्रमाण हे अधूनमधून बघणाऱ्यांपेक्षा थोडे कमी आहे. म्हणजेच दूरदर्शनवरील राजकीय विश्लेषणाचे कार्यक्रम धनगर समाजातील उच्च शिक्षित वर्ग अधूनमधून बघतो. राजकीय विषयावर चर्चा करणाऱ्यांच्या प्रमाणामध्ये नियमित चर्चा करणाऱ्यांचे प्रमाण हे अधूनमधून व एखाद्या वेळेस चर्चा करणाऱ्यांपेक्षा कमी आहे. म्हणजेच राजकीय विषयावर चर्चा ही अधूनमधून जास्त होते. सर्व मूलभूत अधिकारांची जाणीव असणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे.

**राजकीय जागृतीचे स्तरीकरण :-**

उच्च शिक्षित धनगरांच्या राजकीय जागृतीचे स्तरीकरण खालीलप्रमाणे करण्यात आले- उत्तरदात्यांना राजकीय जागृतीविषयी एकूण 5 प्रश्न विचारण्यात आले. त्या प्रत्येक प्रश्नाला चार पर्याय दिले- 1) नियमित, 2) अधूनमधून, 3) एखादया वेळेस आणि 4) अजिबात नाही. या स्तरीकरणामध्ये प्रथम पर्यायाला 10 गुण, द्वितीय पर्यायाला 06 गुण, तृतीय

पर्यायाला 04 गुण व चतुर्थ पर्यायाला शून्य गुण निश्चित करण्यात आले. यावरून उत्तरदात्यांच्या प्रतिसादाला जास्तीत जास्त 50 व कमीतकमी शून्य असे गुण मिळतील. या सर्व प्रश्नांच्या गुणांच्या आधारे राजकीय जागृतीचे तीन स्तर करण्यात आले. 0 ते 15 गुण निम्न राजकीय जागृती, 16 ते 30 मध्य राजकीय जागृती व 31 ते 50 उच्च राजकीय जागृती, असे राजकीय जागृतीचे स्तरीकरण करण्यात आले.

**सारणी क्र. 1.2**
**राजकीय जागृतीचे गुणांकन व स्तरीकरण**

| अ.क्र. | राजकीय जागृतीचे स्तरीकरण | गुण | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 01. | उच्च राजकीय जागृती | 31–50 | 16 | 80% |
| 02. | मध्यम राजकीय जागृती | 16–30 | 04 | 20% |
| 03. | निम्न राजकीय जागृती | 00–05 | 00 | 00% |
| | एकूण | – | 20 | 100% |

वरील राजकीय जागृतीच्या स्तरीकरणाच्या आधारे राजकीय जागृतीची उत्तरदात्यांची स्थिती पुढीलप्रमाणे आहे-

अध्ययनातील एकूण 20 उत्तरदात्यांपैकी उच्च राजकीय जागृती असणाऱ्यांची संख्या 16 असून त्याचे शेकडा प्रमाण 80ः आहे. मध्यम राजकीय जागृती असणाऱ्यांची संख्या 04 असून त्याचे शेकडा प्रमाण 20ः आहे व निम्न राजकीय जागृती असणाऱ्यांची संख्या 00 आहे.

वरील सारणी वरून हे स्पष्ट होते की, उच्च शिक्षित धनगर समाजाची राजकीय जागृती उत्तम आहे. उच्च शिक्षितांमध्ये निम्न स्वरूपाची राजकीय जागृती नाही. सर्व उच्च शिक्षित धनगरांची राजकीय जागृती उच्च किंवा मध्यम स्वरूपाची आहे.

**सारांश :**

प्रस्तुत अध्ययनात नागपूर शहरातील उच्च शिक्षित धनगरांच्या राजकीय जागृतीचे अध्ययन करण्यात आले. या अध्ययनाचे निष्कर्ष म्हणजे उच्च शिक्षित धनगरांमध्ये राजकीय जागृतीचे प्रमाणही उच्च आहे. या निष्कर्षाचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे-

प्रस्तुत अध्ययनातील उत्तरदात्यांमध्ये नियमित वृत्तपत्र वाचणाऱ्यांचे प्रमाण 75ः म्हणजे उत्तम आहे. दूरदर्शनवरील बातम्या नियमित बघणाऱ्यांचे प्रमाण 75ः म्हणजेच उत्तम आहे. राजकीय विश्लेषणाचे कार्यक्रम नियमित बघणाऱ्यांचे प्रमाण 35ः म्हणजे कमी आहे तर अधूनमधून राजकीय विश्लेषणाचे कार्यक्रम बघणाऱ्यांचे प्रमाण 45ः म्हणजे बरे आहे. राजकीय विषयावर नियमित चर्चा करणाऱ्यांचे प्रमाण 20ः म्हणजे कमी आहे. तर अधूनमधून व एखाद्या वेळेस चर्चा करणाऱ्यांचे प्रमाण अनुक्रमे 45ः व 30ः असे आहे म्हणजे बरे आहे. सर्व मूलभूत अधिकारांची जाणीव असणाऱ्यांचे प्रमाण 65ः म्हणजेच चांगले आहे.

एकंदरीत, वृत्तपत्राचे वाचन, दूरदर्शनवरील बातम्या बघणे हे धनगर समाजातील उच्च शिक्षित नियमित करतात. तसेच सर्व मूलभूत अधिकारांची जाणीव असणाऱ्यांचे प्रमाणही चांगले आहे. परंतु, दूरदर्शनवरील राजकीय विश्लेषणाचे कार्यक्रम बघणे, राजकीय विषयावर चर्चा करणे हे धनगर समाजातील उच्च शिक्षित अधूनमधून किंवा एखाद्या वेळेस करीत असतात.

अशा प्रकारे नागपूर शहरातील उच्च शिक्षित धनगरांची राजकीय जागृती उत्तम आहे.

***संदर्भग्रंथ सूची :***


1) *Kini, N. G. S., City voter in India, (New Delhi : Abhinay publication, 1974)*
2) *Kohali, Atul (S.P.); The Success of India's Democracy, (Delhi : NBO publication , 1998)*
3) *इनामदार, एन. आर. व पुराणिक, राजकीय समाजशास्त्र, (पुणे : कॉन्टिनेन्टल प्रकाशन, 1984)*
4) *काळे, प्रा. अशोक, भारतातील (अमरावती शहर विशेष) शहरी उच्च शिक्षित व्यावसासिकांचा राजकीय सहभाग शोधप्रबंध) (अमरावती विद्यापीठ, 1993)*
5) *गभणे, नीता; भंडारा जिल्ह्यातील उच्च शिक्षित व्यावसायिकांच्या राजकीय सहभागाचे चिकित्सक अध्ययन (शोधप्रबंध) (नागपूर विद्यापीठ, 2005)*
6) *सिर्सीकर, व्ही. एम.; 'आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण' (पुणे : कॉन्टिनेन्टल प्रकाशन, 2001)*